भंडारी स्ट्रीट रेल्वे पादचारी पूल बंद

प्रवाशांसाठी पर्यायी मार्गांची व्यवस्था

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मध्य रेल्वेवरील मशीद रेल्वे स्थानकादरम्यानचा भंडारी स्ट्रीट आणि संत तुकाराम मार्ग यांना जोडणारा भंडारी पालिका सार्वजनिक रेल्वे पादचारी पूल धोकादायक झाल्याने तातडीने प्रवाशांसाठी बंद करण्यात आला. नवीन पादचारी पुलाच्या उभारणीसाठी हा निर्णय घेण्यात आला असून, मध्य रेल्वे आणि मुंबई महापालिकेने प्रवाशांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

मध्य रेल्वेच्या वरिष्ठ विभाग अभियंता (पूल/ओएचएस) कार्यालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, सीएसएमटी - मशीद स्थानकांदरम्यान किलोमीटर ०.८८० वरील भंडारी पालिका सार्वजनिक पादचारी पूल (सीएसएमटी बाजू) शनिवारपासून बंद करण्यात आला. या पुलाच्या जागी लवकरच नवीन पादचारी पुलाचे बांधकाम करण्यात येणार आहे. पूल बंद असताना पूर्व-पश्चिम दिशेने ये-जा करणाऱ्या नागरिकांनी आणि रेल्वे प्रवाशांनी मशीद रेल्वे स्थानकाच्या दुसऱ्या बाजूचा पालिका सार्वजनिक पादचारी पूल, सिंदूर पूल किंवा युसूफ मेहरअली रोड या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि सुरक्षित हालचाल सुनिश्चित करण्यासाठी संबंधित स्थानकांवर सार्वजनिक सूचना देण्यात येणार आहेत. तसेच रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) आणि रेल्वे पोलीसांचे कर्मचारी मार्गदर्शनासाठी तैनात करण्यात येणार असून, मशीद स्थानकावर नियमित ध्वनिक्षेपकाद्वारे सूचना दिल्या जाणार आहेत. रेल्वे प्रशासनाने नागरिकांना बंद करण्यात आलेल्या पुलावरून जाण्याचा प्रयत्न न करता केवळ अधिकृत पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

पदवी प्रवेश न मिळण्याच्या तणावाने विद्यार्थिनीची आत्महत्या

कल्याण : कल्याणमधील बी. के. बिर्ला महाविद्यालयातून १२ वी उत्तीर्ण झालेल्या एका विद्यार्थिनीने १८ जून रोजी विषारी द्रव्य पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. मुंबईतील जे. जे. रुग्णालयात उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. अक्षदा भिमसिंग वळवी (१८) असे या विद्यार्थिनीचे नाव असून 'बॅचलर ऑफ कॉस्ट अकाऊंट' या अभ्यासक्रमाला प्रवेशासाठीचे मुंबई विद्यापीठाचे पोर्टल बंद झाल्याने आपले वर्ष आता फुकट जाणार, या तणावातून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.

कल्याण पश्चिमेकडील सह्याद्रीनगर भागातील एका गृहसंकुलात अक्षदा कुटुंबीयांसमवेत राहत होती. मुंबई विद्यापीठाच्या 'बॅचलर ऑफ कॉस्ट अकाऊंट' अभ्यासक्रमाची सीईटी ती चांगल्या गुणाने उत्तीर्ण झाली होती. मात्र प्रवेश न मिळण्याच्या तणावातून तिने विषारी द्रव्य प्राशन केले. त्यानंतर १० दिवसांनी तिचा मृत्यू झाला. हा गुन्हा खडकपाडा पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

विद्यार्थी शाळेत; शिक्षक 'एसआयआर'च्या वर्गात

(पान १ वरून) याचे गणित आता शिक्षक घालत असून, त्यातून उरणाऱ्या वेळात शिकविणार कधी, असाही प्रश्न काहींनी उपस्थित केला. सध्या दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावी या इयत्तांना राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार तयार केलेल्या नव्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके लागू करण्यात आली आहेत. नवा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी शिक्षकांना तयारी करणे गरजेचे असताना, नेमक्या त्याचवेळी २९ जून ते ३१ जुलै या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'एसआयआर' मोहिमेत शिक्षकांना 'बीएलओ' म्हणून काम करावे लागणार आहे.

आधी पूर्ण वेळ काम करण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले. शिक्षक संघटनांकडून आक्षेप घेण्यात आल्यावर मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने २७ जून रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ देऊन शिक्षकांना सुटीच्या दिवशी, तसेच शैक्षणिक कामाच्या वेळेनंतर 'बीएलओ'चे काम देण्याच्या सूचना आल्या. त्यानंतर ३ जुलैला मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना नवे पत्र दिले. त्यात 'बीएलओ' असलेल्या शिक्षकांना कमी तासिका द्याव्यात आणि ते काम नसलेल्या शिक्षकांना 'बीएलओ' कामात साहाय्य करण्याबाबत सूचित करावे, असे नमूद आहे. शाळेची वेळ वगळता अन्य वेळेत, सुटीच्या दिवशी शिक्षकांना 'एसआयआर'चे काम करायला लावणे म्हणजे वेठबिगार समजण्यासारखे आहे. शिक्षकांना शारीरिक, मानसिक स्वास्थ्य, कौटुंबिक जबाबदाऱ्या नसतात का? याचा विपरीत परिणाम होऊन संतापाचा उद्रेक होण्याची स्थिती आहे,' असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी सांगितले. ॲक्टिव्ह टीचर्स फोरमचे संयोजक भाऊ चासकर म्हणाले, 'जनगणनेच्या पहिल्या टप्प्यानंतर शाळा सुरू झाल्यावर २१ दिवस सेतू अभ्यासक्रम राबवण्याचे नियोजन दिले होते. मात्र, 'एसआयआर'चे काम आल्याने अध्यापन विस्कळीत झाले.'

या प्रश्नांचे काय?

- नीती आयोगाच्या अहवालानुसार, राज्यात ८ हजारांहून अधिक एकशिक्षकी शाळा आहेत. त्यात सुमारे दीड लाखांहून अधिक विद्यार्थी शिकतात. या शिक्षकांनाही 'बीएलओ'चे काम आहे. अशा वेळी या विद्यार्थ्यांचे शिक्षण कसे होणार?
- वर्षभरात प्राथमिक वर्गांसाठी किमान २०० दिवस, तर माध्यमिक वर्गांसाठी किमान २२० दिवस अध्यापन होणे बंधनकारक आहे. शिक्षकांच्या 'बीएलओ'च्या कामामुळे अध्यापन होत नसल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षण हक्काचे काय?

'शिक्षण प्राधान्यक्रम नाही का?'

'विद्यार्थी वर्गात, शिक्षक बाहेर, शिक्षण वाऱ्यावर अशी सध्या स्थिती असून, मुलांचे शिक्षण हा आपल्या समाजाचा प्राधान्यक्रम नाही, याचे वैषम्य वाटते. शालेय वेळेव्यतिरिक्त ही कामे करण्याचा सल्ला देणे व्यवहार्य नाही. शिक्षण हक्क कायद्यातील कलम २७ नुसार, शिक्षकांना केवळ जनगणना, प्रत्यक्ष निवडणूक आणि नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाची कामे देण्याची तरतूद आहे. शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करणे आवश्यक आहे,' असे भाऊ चासकर यांनी नमूद केले.

महामुंबईच्या गटांगळ्या

(पान १ वरून) इतर कचरा मॅनहोल किंवा नाल्यांमध्ये अडकून पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी ठिकठिकाणी कर्मचारी सातत्याने सेवा बजावत होते. पावसाचे पाणी उपसण्यासाठी मुंबईत ५४७ पंप बसवण्यात आले असून शनिवारी ४४८ उदंचन संच कार्यान्वित करण्यात आले होते. हे उदंचन संच चालवण्यासाठी प्रशिक्षित पंपचालक प्रत्यक्ष ठिकाणी तैनात करण्यात आले होते. त्याचबरोबर १९ छोटे उदंचन केंद्रे कार्यान्वित करण्यात आले होते.

हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिल्याने मुंबईतील सर्व शाळांना शनिवारी दुपारच्या सत्रात सुट्टी जाहीर करण्यात आली.

रविवारीही अतिवृष्टीचा इशारा

हवामान विभागाने रविवारीही अतिमुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला असून आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे आवाहन मुंबई महापालिका प्रशासनाने केले आहे. नागरिकांनाही आवश्यकता नसल्यास पावसादरम्यान घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन पालिकेने केले आहे. तसेच रविवारी दुपारी ३.२२ वाजता समुद्राला भरती येणार असून या वेळी ४.१९ मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत.

गोवंडीत घर पडले.

गोवंडीतील बैंगनवाडी येथे जी लाइन रोड नं १० येथे दुपारी दीड वाजता एकमजली घर पडले. या दुर्घटनेत एक महिला व एक पुरुष जखमी झाले. त्यांना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

HINDUJA LEYLAND FINANCE

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड

कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN): यू६५९९३एमएच२००८पीएलसी३८४२२१

नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. सी-२१, टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई - ४०००५१

कॉर्पोरेट कार्यालय: 27ए, डेव्हलप्ड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई, तामिळनाडू - ६०००३२

टेली.: (०४४) २२४२७५२५; **वेबसाईट:** https://hindujaleylandfinance.com/;

ईमेल: investorrelations@hindujaleylandfinance.com

नमुना क्र. सीएए.२

[कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३०(३) आणि कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ व ७ च्या अनुषंगाने]

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांचे समक्ष

कंपनी योजना अर्ज सी.ए. (सी.ए.ए.) /१०७/एमबी/२०२६

कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात

आणि

कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ सह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींच्या प्रकरणात

आणि

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड आणि एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड) आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण योजनेच्या प्रकरणात

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड, कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींतर्गत स्थापित कंपनी आणि)
कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत अस्तित्वात असलेली कंपनी, नोंदणीकृत कार्यालय, प्लॉट क्र. सी-२१,)
टॉवर सी (१-३ मजला), जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००५१.)
CIN: यू६५९९३एमएच२००८पीएलसी३८४२२१) .....पहिली अर्जदार कंपनी / हस्तांतरकर्ता कंपनी

हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड च्या असुरक्षित धनकोंची सभा घेण्यात येणार असल्याची सूचना व सूचनेची जाहिरात

याद्वारे **सूचित** करण्यात येते की माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (**''माननीय न्यायाधिकरण''**) यांनी कंपनी योजना अर्ज क्र. सी.ए. (सीएए)/१०७/एमबी/२०२६ मध्ये पारित केलेल्या दि. १७ जून, २०२६ च्या आदेशान्वये (**''आदेश''**) त्यांनी इतर बाबींशिवाय असे निर्देश दिले की **हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड** (**'हस्तांतरकर्ता कंपनी'' किंवा ''कंपनी''**) च्या सुरक्षित धनकोंची सभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग किंवा इतर दृक्श्राव्य पद्धतींनी (**'व्हीसी/ओएव्हीएम'**), (**'सभा'**) घेण्यात यावी ज्यात हिंदुजा लेलँड फायनान्स लिमिटेड चे एनडीएल व्हेंचर्स लिमिटेड (पूर्वीची नेक्स्टडिजिटल लिमिटेड) आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमधील शोषण करून विलीनीकरण करण्याची प्रस्तावित योजना (**''योजना''**) विचारात घेण्यात यावी, आणि योग्य वाटत असल्यास, बदलांसह किंवा बदलांशिवाय मंजूर करण्यात यावी.

माननीय एनसीएलटी यांचा सदर आदेश आणि त्यातील निर्देशांच्या अनुषंगाने कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ आणि त्याअंतर्गत इतर लागू नियमांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ (**''अधिनियम''**) मधील तरतुदींचे, आणि व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून आमसभा घेण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने जारी केलेल्या लागू सामान्य परिपत्रकांचे पालन करीत असुरक्षित धनकोंची आमसभा गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ रोजी दु. ०४.४५ वाजता घेण्यात येणार आहे आणि इंस्टीट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या सेक्रेटरीयल स्टँडर्ड ऑन जनरल मीटींग्ज (''SS-2'') आणि सदर नियमांसह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियामातील लागू तरतुदींचे पालन करीत असुरक्षित धनकोंना ई-मतदान सुविधा देण्यात येणार आहे. ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून राबविण्यात येणार असल्याने समभागधारकांनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही.

कंपन्या (तडजोडी, तरतुदी व एकत्रीकरण) नियम, २०१६ मधील नियम ६ आणि दि. ०४ जुलै, २०२६ रोजीच्या सदर सूचनेची संबंधित जोडपत्रे यांसह वाचण्यात येणाऱ्या कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद १०२ आणि सदर अधिनियमातील इतर लागू तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद २३०(३) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार दि. २६ जून, २०२६ रोजी ज्या सभासदांचे ई-मेल ॲड्रेस कंपनी/डिपॉझिटरीज, डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स (DPs) / कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्स्फर एजंट - केफिन टेक्नोलॉजीज लिमिटेड / एमयुएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (**''आरटीए''**) यांचेकडे आधीच नोंदविलेले आहेत त्यांना वर नमूद दि. ०४ जुलै, २०२६ रोजीची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्याचे काम पूर्ण केले आहे.

हस्तांतरकर्ता कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (**''एनएसडीएल''**) च्या www.evoting.nsdl.com येथे योजनेसह खुलासापर विवरण आणि संबंधित जोडपत्रांसह सदर सूचनेची प्रत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

कुणाही असुरक्षित धनकोस सूचना, खुलासापर विवरण आणि इतर दस्तावेजांची छापील प्रत हवी असल्यास त्यासाठी ते हस्तांतरकर्ता कंपनीकडे २७ ए, डेव्हलप्ड इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई - ६०००३२, तामिळनाडू येथे विनंती पाठवू शकतात आणि हस्तांतरकर्ता कंपनी त्या असुरक्षित धनकोच्या नोंदणीकृत पत्त्यावर ते पाठवेल. त्याशिवाय, असुरक्षित धनको वर नमूद दस्तावेज सभा सुरु होण्यापूर्वी 48 तासांपर्यंत हस्तांतरकर्ता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातून सर्व कामकाजाच्या दिवशी (शनिवार व रविवार सोडून) स. ११ (भाप्रवे) ते दु. १.०० वाजेपर्यंत (भाप्रवे) निःशुल्क प्राप्त करू शकतात.

www.hindujaleylandfinance.com या कंपनीच्या वेबसाईटवर गुंतवणूकदार विभागांतर्गत सूचनेत नमूद केल्यानुसार दस्तावेजांची इलेक्ट्रॉनिक प्रत पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ही सभा व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून घेण्यात येत असल्याने असुरक्षित धनकोंनी प्रत्यक्ष उपस्थित होण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार, सदर सभेसाठी हस्तांतरकर्ता कंपनीच्या असुरक्षित धनकोंनी प्रतिनिधी नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध नाही. एनसीएलटी द्वारे भरविण्यात येणाऱ्या या सभेचे अध्यक्ष म्हणून माननीय न्यायाधिकरण यांचेद्वारे श्री देवी प्रसाद सेमवाल, आयआरएस (निवृत्त) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर अधिनियमातील अनुच्छेद २३०(६) नुसार कंपनीच्या आवश्यक बहुसंख्य असुरक्षित धनकोंनी ही योजना मंजूर केल्यास ती माननीय न्यायाधिकरण आणि आवश्यक वाटेल त्यानुसार इतर कोणत्याही नियामक किंवा वैधानिक प्राधिकरणे यांचेकडून इतर मंजुऱ्या, परवानग्या आणि संमतीच्या अधीन असेल.

ई-मतदान:

एनसीएलटी यांच्या आदेशामधील तरतुदी आणि सुधारित कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद १०८ आणि इतर लागू तरतुदी, SS-2, आणि ई-मतदानाच्या माध्यमातून आमसभा भरविण्यासाठी कॉर्पोरेट बाबी मंत्रालयाने विहित केलेल्या आवश्यकतांच्या अनुषंगाने कंपनीद्वारे आपल्या असुरक्षित धनकोंना सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदान आणि सभा सुरु असताना एनएसडीएल द्वारे उपलब्ध करून देण्यात येणारी ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेस उपस्थित होण्याची आणि ई-मतदानाची तपशीलवार प्रक्रिया सभेच्या सूचनेचा भाग आहे. दूरस्थ ई-मतदानाशी संबंधित महत्त्वाचे तपशील खाली देण्यात आलेले आहेत:

ई-मतदानासाठी कट-ऑफ दिनांक	२३ जुलै, २०२६ (गुरुवार)
दूरस्थ ई-मतदान कालावधी सुरु होणे	२७ जुलै, २०२६ (सोमवार) रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे)
दूरस्थ ई-मतदान कालावधी समाप्ती	२९ जुलै, २०२६ (बुधवार) रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे)

त्यानंतर एनएसडीएल द्वारे दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल. कंपनीद्वारे सभेमध्येसुद्धा ई-मतदानाची सुविधा देण्यात येत आहे. असुरक्षित धनकोंचे मतदान हक्क कट-ऑफ दिनांकास म्हणजे २३ जुलै, २०२६ रोजी त्यांच्या थकबाकीच्या मूल्याच्या गुणोत्तराच्या प्रमाणात असतील. कट-ऑफ दिनांकास ज्या व्यक्तीचे नाव कंपनी / आरटीए कडे असुरक्षित धनको म्हणून नोंदविलेले असेल त्यांनाच मतदान करता येईल.

असुरक्षित धनकोंना सभा सुरु असताना ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी (सभेच्या अगोदर) दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून ठरावावर मतदान केलेले नसेल त्यांना सभेत त्या ठरावावर मतदान करता येईल. सभेच्या अगोदर दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून ठरावावर मतदान करणारया असुरक्षित धनकोंना व्हीसी/ओएव्हीएम च्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होता येईल, परंतु त्या ठरावावर पुन्हा मतदान करता येणार नाही. सभेच्या दिवशी सभा संपल्यानंतर १५ मिनिटांनी एनएसडीएल द्वारे ई-मतदान मॉड्यूल खंडित करण्यात येईल.

कट-ऑफ दिनांकानंतर कंपनीचे असुरक्षित धनको होणारया एखाद्या व्यक्तीस सभेचे कामकाज पाहायचे असल्यास ते त्यासाठी एनएसडीएल यांचेकडे evoting@nsdl.com येथे किंवा कंपनी/आरटीए कडे विनंती करून लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकतात. परंतु, अशा व्यक्तीस ठरावावर मतदान करता येणार नाही.

ज्या असुरक्षित धनकोंनी आपले ई-मेल ॲड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना विनंती आहे की ते डीमॅट स्वरुपात समभाग धारण करीत असल्यास त्यांनी ते डिपॉझिटरी पार्टीसिपंटकडे नोंदवावेत. ज्या असुरक्षित एनसीडी धारकांचे ईमेल ॲड्रेस नोंदविलेले नाहीत त्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर सभेची सूचना देणारी छापील पत्रे पाठविण्यात येत आहेत.

माननीय न्यायाधिकरण यांनी दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया तसेच सभा सुरु असताना ई-मतदान योग्य व पारदर्शक पद्धतीने पार पडावे यासाठी परिनिरीक्षण करण्यासाठी हस्तांतरकर्ता कंपनीचे परिनिरीक्षक म्हणून आणि सभा समाप्त झाल्यापासून ३ (तीन) दिवसांचे आत झालेल्या मतदानाबाबत सभेच्या अध्यक्षांकडे किंवा अध्यक्षांनी अधिकृत केलेल्या कुणाही व्यक्तीकडे अहवाल सादर करण्यासाठी प्रणय डी. वैद्य & कं., कंपनी सचिव, व्यवसाय परवाना क्र. २४३३९ यांची नियुक्ती केलेली आहे.

त्यानुसार, असुरक्षित धनकोंना विनंती आहे की त्यांनी वर नमूद पद्धतीने, दिनांकास व वेळी सभेस उपस्थित व्हावे. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेच्या माध्यमातून सभेमध्ये सहभागी होणारया असुरक्षित धनकोंची उपस्थिती सदर अधिनियमातील अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमसाठी ग्राह्य धरण्यात येईल. सभा सुरु होताना सभेसाठी सदर उल्लेखित कोरम उपस्थित नसल्यास सभा ३० मिनिटांसाठी बरखास्त करण्यात येईल, त्यानंतर, उपस्थित असुरक्षित धनको हेच कोरम आहे असे समजण्यात येईल.

०१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत मतदानाचे निकाल कंपनीच्या वेबसाईटवर www.hindujaleylandfinance.com येथे आणि एनएसडीएल च्या वेबसाईटवर www.evoting.nsdl.com येथे प्रदर्शित करण्यात येतील, शिवाय बीएसई लिमिटेड यांचेकडेसुद्धा पाठविण्यात येतील.

काही प्रश्न / तक्रारी असल्यास, असुरक्षित धनको धनकोंसाठी सहसा विचारण्यात येणारे प्रश्न (''FAQs'') पाहू शकतात किंवा १८०० २२२ ९९० वर कॉल करू शकतात किंवा www.evoting.nsdl.com येथे विनंती पाठवू शकतात किंवा एनएसडीएल च्या पल्लवी म्हात्रे यांचेशी evoting@nsdl.com येथे संपर्क साधू शकतात.

स्वा/-
देवी प्रसाद सेमवाल
सभेसाठी नियुक्त अध्यक्ष

स्थान: ग्रेटर नोएडा
दिनांक: ०४ जुलै, २०२६

प्रसादित्य एआरसी लिमिटेड

आधी प्रिथ्वी ॲसेट रिकन्स्ट्रक्शन
ॲण्ड सिक्युरिटायझेशन कंपनी लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे

नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय: डी.नं.१-५५, राजा प्रसादमू, ४था मजला, विंग-१, मसिद बांदा रोड, कोंडापूर, हैदराबाद - ८४, टेलि.: ०४०- ४१४१३३३३
सीआयएन: यू६७१२०टीजी२००७पीएलसी०५३३२७, ईमेल: co@paras.gor.in, वेब: www.paras.org.in

मे. मिड सिटी प्रोजेक्ट्स एलएलपी यांच्या खात्यात ठेवलेल्या तारण मालमत्तेची विक्री

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या (नियम ८(६) च्या तरतुदीचा संदर्भ घ्या).

सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) ची तरतुद सहवाचता स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार व जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता मे. प्रसादित्य एआरसी लिमिटेड (पीएआरसी) (आधी प्रिथ्वी ॲसेट रिकन्स्ट्रक्शन ॲण्ड सिक्युरिटायझेशन कंपनी लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे), (''सुरक्षित धनको'') यांच्याकडे गहाण आहे, सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने ज्याचा रचनात्मक ताबा घेतला आहे, त्याची विक्री, निम्नस्वाक्षरीकार यांच्याद्वारे सरफेसी कायद्याच्या तरतुदींनुसार, ''जशी आहे तशी आहे'', ''जे आहे ते'' आणि ''तिथे जे काही आहे ते'' या तत्त्वावर, खाली नमूद केलेल्या तारखेला, वेळेला आणि ठिकाणी ऑनलाइन जाहीर लिलावाद्वारे केली जाईल. सदर ही विक्री, सुरक्षित धनकोची रु. ६,९३,५४,४०२/- (रुपये सहा कोटी त्र्याण्णव लाख चौपन्न हजार चारशे दोन फक्त) दि. १७.०६.२०२६ रोजीनुसार मे. मिड सिटी प्रोजेक्ट्स एलएलपी (त्यांच्या भागीदारांमार्फत) यांच्या कर्ज खाते क्रमांक: एस०००२४०४७५ यावर पुढील व्याज आणि त्यावरील खर्चासह इतकी थकबाकी वसूल करण्यासाठी केली जाईल. कर्ज खाते क्र. : एस०००२४०४७५ त्याच्या मूळ तारणासह, स्थावर मालमत्तेसहीत, सन्मान कॅपिटल लिमिटेड (आधी इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लि. म्हणून ओळखले जाणारे) यांच्याद्वारे दिनांकित ३१.१२.२०२५ रोजीच्या हस्तांतरण करारनाम्याद्वारे सुरक्षित धनकोला हस्तांतरित करण्यात आले होते.

स्थावर तारण मालमत्तेचे वर्णन

बाब क्र. १

फ्लॅट क्र.: ११०१

खालीलप्रमाणे मालमत्ता/युनिट/अपार्टमेंट/फ्लॅट (बांधलेले/बांधले जाणारे) त्यावरील सर्व वर्तमान आणि/किंवा भविष्यातील एफएसआय आणि सर्व वर्तमानसह एकत्रित आणि/किंवा भविष्यातील संरचना, फर्निचर, फिक्स्चर्स, फिटिंग्ज, स्थायी आणि/किंवा स्थापित/स्थापित केली जाणारी प्लांट आणि उपकरणे आणि/किंवा त्यावर बांधलेले/बांधले जाणारे आणि त्यामधील संबंधित मालकाचे सर्व वर्तमान आणि भविष्यातील हक्क, मालकी आणि/किंवा त्यामधील संबंधित मालकाचे हितसंबंधसह यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल:

अ. क्र.	विंग/टॉवर	युनिट/फ्लॅट	मजला	कार्पेट क्षेत्रफळ (चौरस फूट)	मालक
१.	व्हाइटफील्ड	११०१	११	१८००	श्री. जागृती ध्रुव
	एकूण			१८००	

एकूण १ युनिट/अपार्टमेंट/फ्लॅट आणि एकूण १८०० चौरस फूट (कार्पेट एरिया) वरील युनिट/अपार्टमेंट/फ्लॅटसाठी वाटप केलेल्या/करण्यात येणाऱ्या २ कार पार्किंग जागांसह (तळमजल्यावर) एकत्रित, सध्या ''व्हाइटफील्ड'' (पूर्वीचे नाव स्वारोस्की) नावाच्या इमारतीत/प्रकल्पात आणि सध्या नंददीप को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड नावाने ओळखली जाणारी सोसायटी, नगर नियोजन योजना क्र. ३ च्या प्लॉट क्र. ६८४ यावर बांधलेले/बांधण्यात येणार आहे, ज्याचा नवीन सीटीएस क्र. ई/१४७ आहे. मोजमापे क्षेत्रफळ ७१९ चौरस मीटर आणि नगर नियोजन योजना क्र. ३ चा प्लॉट क्र. ६८४ आणि नवीन सीटीएस क्र. ई/१५१, मोजमापे क्षेत्रफळ ७३५.८९४ चौरस मीटर, एकूण १,४५४.८९४ चौरस मीटर क्षेत्रफळ, १६ वा रस्ता, खार (पश्चिम), गाव वांद्रे, मुंबई - ४०००५२, महाराष्ट्र, मुंबई उपनगर नोंदणी जिल्ह्याच्या हद्दीतील (''निर्देशित जमीन'') येथे पसरलेले, धारण आणि स्थित असलेले वरील निर्देशित जमीन, सामायिक क्षेत्रे आणि सामायिक सुविधा/सोयी यांमधील प्रमाणशीर अविभाजित हिस्सा, हक्क, मालकी आणि/किंवा हितसंबंधांसह एकत्रित.

बाब क्र. २

फ्लॅट क्र.: १२०१:

खालीलप्रमाणे मालमत्ता/युनिट/अपार्टमेंट/फ्लॅट (बांधलेले/बांधले जाणारे) त्यावरील सर्व वर्तमान आणि/किंवा भविष्यातील एफएसआय आणि सर्व वर्तमानसह एकत्रित आणि/किंवा भविष्यातील संरचना, फर्निचर, फिक्स्चर्स, फिटिंग्ज, स्थायी आणि/किंवा स्थापित/स्थापित केली जाणारी प्लांट आणि उपकरणे आणि/किंवा त्यावर बांधलेले/बांधले जाणारे आणि त्यामधील संबंधित मालकाचे सर्व वर्तमान आणि भविष्यातील हक्क, मालकी आणि/किंवा त्यामधील संबंधित मालकाचे हितसंबंधसह यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल:

अ. क्र.	विंग/टॉवर	युनिट/फ्लॅट	मजला	कार्पेट क्षेत्रफळ (चौरस फूट)	मालक
१.	व्हाइटफील्ड	१२०१	१२	११३०	श्री. हिरेन ध्रुव
	एकूण			११३०	

एकूण १ युनिट/अपार्टमेंट/फ्लॅट, ज्याचे एकूण क्षेत्रफळ ११३० चौरस फूट (कार्पेट एरिया) आहे, तसेच वरील निर्देशित युनिट/अपार्टमेंट/फ्लॅटसाठी वाटप केलेल्या/केल्या जाणाऱ्या २ कार पार्किंग जागा (तळमजल्यावर), सध्या ''व्हाइटफील्ड'' (पूर्वीचे स्वारोस्की) नावाच्या इमारतीत/प्रकल्पात आणि सध्या नंददीप को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड नावाने ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमध्ये, नगर नियोजन योजना क्र. ३ च्या प्लॉट क्र. ६८४ वर बांधलेले/बांधले जाणार असून, त्याचा नवीन सीटीएस क्रमांक ई/१४७ आहे, मोजमापे क्षेत्रफळ ७१९ चौरस मीटर आणि नगर नियोजन योजना क्र. ३ चा प्लॉट क्र. ६८४, ज्याचा नवीन सीटीएस क्रमांक ई/१५१ आहे, मोजमापे क्षेत्रफळ ७३५.८९४ चौरस मीटर, एकूण एकत्रित क्षेत्रफळ १,४५४.८९४ चौरस मीटर येथे स्थित १६ वा रस्ता, खार (पश्चिम), गाव वांद्रे, मुंबई - ४०००५२, महाराष्ट्र मुंबई उपनगर नोंदणी जिल्ह्याच्या हद्दीत (''निर्देशित जमीन'') येथे प